बीड । बुधवार

०२.०४.२०२५

वर्षे : ५ अंक : ०३

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955









# पालकमंत्री अजितदादा डॉ .सी. एस.थोरात सारख्या चांगल्या अधिकाऱ्यांना बीडमधे काम करु द्या

## बीड जिल्ह्यातील सर्व सामान्य नागरिकांची आपल्याकडे अपेक्षा आहे





**बीड । प्रतिनिधी**

बीडचे सिव्हील सर्जन डॉ. अशोक थोरात हे एक चांगले अधिकारी आहेत. असा एखादाच चांगला अधिकारी मिळतो २०१८ मध्ये बीड जिल्हाला सर्वोच्च बहुमान मिळवून दिलेल्या जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांचे निलंबन पालकमंत्री अजित दादा नी मागे घ्यावे. अशी मागणी जिल्ह्यातील सर्व सामान्य नागरिक करीत आहेत.

रात्री, अपरात्री रुग्णांसाठी त्यांना फोन लावा ते कार्यतत्पर असतात अतिदक्षता सुविधा मिळवून देणे यासाठी थोरात कुठेच कमी पडलेले नाहीत. मात्र त्यांच्यावर निलंबनाची कारवाई झाली, दादा तुम्ही बीड चे पालकमंत्री आहात या नात्याने तुम्ही जातीने लक्ष घालून. निलंबन मागे घ्यायला लावा. थोरात यांच्यासाठी लोकं रस्त्यावर उतरली, लोकांसाठी झटणारा अधिकारी म्हणून थोरातांची ओळख आहे मात्र त्यांनाही घालवून टाकले. यात लोकांचा रोष पालकमंत्री म्हणून थेट तुमच्यावर सुद्धा आहे. डॉ.अशोक थोरात यांनी कोरोनाकाळात ▶▶ उर्वरित पान २ वर

# कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी स्वत:चीच दुकाने थाटली ?

## निकृष्ट दर्जाच्या निविष्ठा शेतकऱ्यांच्या माथी मारल्याने शेतकरी संकटात आ.सुरेश धस यांचा गंभीर आरोप

**आष्टी । प्रतिनिधी**



महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागातील काही अधिकारी कर्मचाऱ्यांनी बेकायदेशीरपणे नातेवाईक आणि मित्रांच्या नावे कृषी निविष्ठा उत्पादक कंपन्या आणि विक्री केंद्र सुरू केली असून या जबाबदार अधिकाऱ्यांची माहिती आपण मागितली असून या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याची मागणी करणार आहोत अधिकाऱ्यांनी स्वतःच्याच कंपन्या स्थापन करून निकृष्ट दर्जाच्या निमित्त शेतकऱ्यांच्या माती मारल्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी होऊन शेतकऱ्यांना संकटाला सामोरे जावे लागल्यामुळे शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ आली मात्र अधिकारी मालामाल होण्यासाठी प्रयत्न करत आहेत हे महाराष्ट्र राज्याच्या दृष्टीने अत्यंत दुर्दैवी आहे त्यामुळे या सर्व अधिकाऱ्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्याची आपण मागणी करणार आहोत असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले आष्टी येथील विशेष पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले,महाराष्ट्रील कृषि क्षेत्र वरचेवर संकटात असल्याने महाराष्ट्रील शेतकरी आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त होत आहे. शेतकरी आत्महत्या ▶▶ उर्वरित पान २ वर

# दगडवाडी महिलांनी अंगावर पेट्रोल ओतून घेतले तर काहीजण टाकीवर चढून बसले

## राखीव जमिन कंठाळे, नागरेंनी विक्रीला काढली ; गावकर्यांचा सामुहिक आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील दगडवाडी येथे १०० एक्कर जमीन जनावरे चरण्यासाठी राखीव ठेवण्यात आली होती. ही जमीन दोघाजणांच्या नावे करण्यात आली होती. मात्र या दोघांनी हळूहळू जमीनविक्री करण्यास सुरूवात केली. या विक्रीला गावकर्यांनी विरोध दर्शविला असून आज सर्व गावकर्यांनी एकत्रित येत पाण्याच्या टाकीवर चढून सामुहिक आंदोलन सुरू केले तर काही महिलांनी अंगावर पेट्रोल ओतून घेत सामुहिक आत्म दहन करण्याचा प्रयत्न केला.



घटनास्थळी पोलीस दाखल झाले होते.

शिरूर तालुक्यातील दगडवाडी येथे १९६० पासून गट नं. १८४, १८५, १८६, २१८, २२० क्षेत्रातील जमीन जनावरे चारण्यासाठी राखीव ठेवण्यात आलेली आहे.ही जमीन जवळपास १०० एक्कर असून सदरील जमीन कंठाळे आणि नागरे या दोन व्यक्तीच्या नावावर करण्यात आली होती. गेल्या काही महिन्यापासून या दोन्ही व्यक्तीने हळुहळू जमीन विक्री करण्या सुरूवात केली. या जमीन विक्रीला गावकर्यांनी विरोध दर्शविला.दोषी विरोधात कारवाई करण्यात यावी अशी मागणी गावकर्यांनी प्रशासनाकडे केली होती. मात्र याची दखल घेतली जात नव्हती. आज गावकर्यांनी एकत्रित येत सामुहिक आंदोलन करण्यास सुरूवात केली. काही नागरिक टाकीवर चढून बसले तर काही नागरीक टाकीच्या खाली आंदोलन करत होते. महिलांनी अंगावर पेट्रोल ओतुन घेत आत्म दहन करण्याचा प्रयत्न केला. घटनास्थळी पोलीस दाखल झाले होते.

# बोंबला, १ कोटी ८१ लाख रुपये खर्च करुन गावाला पाणी मिळेना जलजीवनच्या कामात झाला भ्रष्टाचार

**● कामखेड्याची जनता रस्त्यावर उतरणार**

**बीड । प्रतिनिधी**

कामखेडा येथे जलजीवन योजने अंतर्गत १ कोटी ८१ लाख ९७ हजार ७०० रूपयांचा खर्च करण्यात आला. हा खर्च तेवढा सार्थकी लागला नाही. एवढे पैसे खर्च करूनही गावकर्यांना वेळेवर पाणी मिळत नाही. येत्या १५ दिवसात सुरूळीतपणे पाण्याचा पुरवठा न झाल्यास नागरीक ७ एप्रिल २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करणार आहेत.

बीड जिल्ह्यामध्ये जलजीवन योजना राबविण्यात आली. अनेक गावामध्ये या योजनेचा बट्ट्याबोळ झाला. गुत्तेदार व ग्रामपंचायतीने संगनमत करून या योजनेचे माथेरे केले. बीड तालुक्यातील कामखेडा येथे १ कोटी ८१ लाख ९७ हजार ७०० रूपयांची जलजीवनची योजना राबविण्यात आली. या योजनेचे काम व्यवस्थीत झाले नाही. जागो जागी पाईपलाईन लिकेज होते. टाकीमध्ये पाणी सोडण्यासाठी विविध अडचणी निर्माण होतात. त्यामुळे गावकर्यांना १५ दिवसाला पाणी मिळू लागले. व्यवस्थीत पाणी पुरवठ्या संदर्भात तक्रारी करण्यात आल्या. मात्र त्याची दखल घेतली नाही. जि.प. पाणी पुरवठा विभागही याकडे दुर्लक्ष करीत आहे. येत्या १५ दिवसात पाणी पुरवठा सुरळीत न झाल्यास नागरीक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करणार आहेत असा इशारा शेख हमीद, नेवडे गणेश, बाबासाहेब केशव नेवडे, शेख मुस्ताख, भाऊसाहे ढोरमारे, शेख इसाक यांनी दिला आहे.

# बीड सांगवी महादेव दरा देवराई येथे दर्जेदार वनराई निर्मिती करणार...

## चांगला श्वास घेणारा जगातील सर्वात श्रीमंत माणूस : प्रसिद्ध सिने अभिनेते सयाजी शिंदे

## देवराई अधिक प्रभावीपणे राबविणार: आ.सुरेश धस



**आष्टी । प्रतिनिधी**

मला माझ्या आयुष्यात हे लक्षात आले आहे की, जगात आई असणे आणि वृक्ष असणे या दोन गोष्टी सारख्या असून आई नसती तर आपण नसतो आणि वृक्ष नसते तर जगातला कोणताही व्यक्ती शिल्लक राहिला नसता असे महत्त्वपूर्ण प्रतिपादन प्रसिद्ध सिने अभिनेते आणि देवराई चे निर्माते संस्थापक सयाजी शिंदे यांनी केले. आष्टी तालुक्यातील बीडसांगवी येथील महादेव दरा या ठिकाणी देवराई संस्थेमार्फत विविध प्रकारचे वृक्ष लागवड करण्यात येणार असून या प्रकल्पाचे भूमिपूजन करताना ते बोलत होते.

▶▶ उर्वरित पान २ वर

# ती दारुची नशा नव्हे, धर्मांधतेचा विचार'त्या' आतंकवाद्यांवर युएपीए/एनएसए अंतर्गत गुन्हा दाखल करा ;गेवराई कडकडीत बंद

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील अर्धमसला येथे मस्जिदमध्ये करण्यात आलेल्या जिलेटीन स्फोट प्रकरणातील दहशतवाद्यांवर युएपीए एनएसए अंतर्गत गुन्हा दाखल करावा व सदरील स्फोटाची चौकशी एनआयएकडून करावी, या मागणीसाठी मुस्लिम बांधवांच्या वतीने गेवराई बंदचे आवाहन करण्यात आले, त्या आवाहनाला गेवराईकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आज गेवराई कडकडीत बंद असून शहरात पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. गेवराई तालुक्यातील अर्धमसला येथील विजय गव्हाणे व सागडे या दोघांनी येथील मस्जिदमध्ये जिलेटीन स्फोट घडवून आणला. त्याआधी विजय गव्हाणे याने 'तुमची मस्जिद काढून घ्या, नाहीतर मी उडवून देईल' अशा




प्रकारची धमकी दिली होती. त्याचबरोबर जिलेटीनसह एक व्हिडिओ काढून तो इन्स्टाग्रामवर टाकून दहशत निर्माण केली होती. सदरचा प्रकार हा दहशतवादी आणि आतंकवादाचाच आहे, त्यामुळे या दहशतवाद्यांवर युएपीए, एनएसए अंतर्गत गुन्हा दाखल करावा व सदर प्रकरणाचा तपास एनआयएकडून करावा, या मागणीसाठी आज गेवराई बंदचे आवाहन करण्यात आले होते. सदरचे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टामध्ये

▶▶ उर्वरित पान २ वर

## दैनिक मराठवाडा पत्रच्या वर्धापन दिनानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या, सर्वांचे मन:पूर्वक आभार












# चैत्र गौरीचे आगमन, झाले प्रसन्न मन

भारतीय संस्कृतीमध्ये सन समारंभाला अनन्यसाधारण महत्त्व आहे .महाराष्ट्रात चैत्र महिन्या मध्ये शुक्ल पक्षात चैत्र शुक्ल तृतीयेपासून चैत्रगौर बसवली जाते. हा एक धार्मिक आणि पारंपारिक सोहळा वैशाख शुक्ल तृतीया अर्थात अक्षय तृतीयेपर्यंत साजरा केला जातो . शिवपत्नी पार्वती ही गौरी (सरस्वती ) रूपात पूजली जाते ही पितळेच्या किंवा लाकडाच्या पाळण्यात बसलेली गौर या चैत्र महिन्यामध्ये आपल्या माहेरी येते अशी अख्यायिका आहे चैत्र शुक्ल तृतीयेला या पितळेच्या किंवा लाकडी पाळण्यातल्या गौरीला सुगंधी तेल ,अत्तर लावून कोमट पाण्याने स्नान घातले जाते. त्यानंतर नवीन वस्त्र, अलंकार ,वस्त्रमाळा ,गाठी हार, पुष्पहार घालून सालंकृत पूजा केली जाते .खन नारळ ओटी भरून, फळं, खीर, कानोला मुरमुरे ,बत्तासे ,भिजवलेले हरभरे किंवा हरभरा डाळ टरबूज, पानसुपारी इत्यादीचा नैवेद्य दाखवून आरती केली जाते .संपूर्ण चैत्र महिना मनोभावे पुष्प अर्पण करून या चैत्रगौरीला पुजले जाते दुसऱ्या तीजला म्हणजेच तृतीयेला परत एकदा स्नान घालून, सालंकृत पूजा करून आपल्या सोयीप्रमाणे महिन्यातील एक दिवस सर्व फराळाचे पंच पकवांना जसे करंजी ,लाडू ,अनारसे ,चकली शेव, इत्यादी करून सुवासिनी आणि कुमारिकांना हळदीकुंकवासाठी बोलावले जाते .त्यामध्ये गौरीला सजवून, अलंकृत करून शोभिवंत आरास मांडून ,कैरी घालून वाटलेली हरभरा डाळ ,कैरीचे पणहे मुरमुरे, हाताला चंदनाचा लेप, सुगंधी अत्तर लावून सुवासिनींना आणि कुमारीकांना हळदीकुंकू, विड्याच्या पानाचे तांबूल दिले जाते. बऱ्याच ठिकाणी चैत्रगौरी पुढे किंवा घराच्या अंगणात चैत्रांगण काढले जाते म्हणजेच हिंदू संस्कृतीची प्रतीके रंगीत रांगोळीने रेखाटली जातात त्यालाच चैत्रंग असे म्हणतात. त्यामध्ये देवीची शस्त्रे जसे शंख, चक्र, गदा ,पद्म आणि तिची वाहने म्हणजे गाय, हत्ती, कासव, नाग, गरुड त्याचबरोबर देवीची सौभाग्याची लेणी म्हणजे फनी, करंडा ,आरसा ,मंगळसूत्र, सुवासिनींच्या ओटीचे ताट त्याचबरोबर स्वस्तिक ,ओमकार , तुळशी वृंदावन ,आंबा, श्रीफळ, उंबर, पिंपळ वगैरे पूज्यवृक्ष, चैत्रगौरीचा पाळणा ,गणपती समई ,कमळ, कासव, सूर्य, चंद्र , त्रिशूल इत्यादी आकृत्या रंगीत रांगोळीने रेखाटून हिंदू संस्कृतीचे प्रतीके दाखवली जातात .सर्व कौतुक होत असताना अखेर अक्षय तृतीयेच्या दिवशी गौर पुन्हा सासरी जायला निघते तेव्हा तिला खीर कानोला, दहीभात ,आंब्याचा रस असा नैवेद्य दाखवला जातो



सण समारंभ आणि विज्ञानाची सांगड घालून बारकाईने विचार केला तर त्यामागे एक प्रकारे आरोग्य समृद्धी ,प्रेमभावना, एकी दृढ करण्याचा प्रयत्न आणि त्यामधून मनाची प्रसन्नता दिसून येते.

जसे पहा कैरीचे पन्हे... कच्च्या आंब्यापासून बनवलेले हे पन्हे शरीरातील उष्णतेचा दाह कमी करते ,शरीरातील पीएच संतुलन ठेवते म्हणजेच आम्लपित्त संतुलित करते, त्यामध्ये जीवनसत्व –अ असल्याकारणाने डोळे निरोगी ठेवते ,चैतन्य वाढवते, त्याचबरोबर अँटिऑक्सिडंट गुणधर्मामुळे कर्करोगाचा धोका टाळण्यास मदत होते , गुणधर्मामुळे चेहऱ्यावरील सुरकुत्या रोखण्यास ,वृद्धत्व मंदावण्यास मदत करते .त्यामध्ये कोलेस्ट्रॉल नसल्यामुळे अतिरिक्त वजन वाढीपासून वाचवते, पोटॅशियम भरपूर प्रमाणात असल्यामुळे हृदयरोगाचा धोका कमी करते, त्याचबरोबर फायटोकेमिकल्स चरबीवर परिणामकारक ठरते.

त्यानंतर हरभरा... किंवा त्याची भिजवलेली डाळ ही जीवनसत्वे आणि खनिजे यांचा उत्तम स्त्रोत आहे त्यामध्ये असलेले मॅग्नेशियम ,पोटॅशियम झिंक, सेलेनियम, मॅंग्रीज ,कॉपर आणि जीवनसत्व बी हे आरोग्यासाठी अतिशय पोषक. त्याचबरोबर तणाव आणि चिंता या सारख्या समस्यांपासून दूर ठेवते, हाडे मजबूत होणे, रक्तदाब नियंत्रित ठेवणे, त्याचबरोबर त्यामधील लोह असल्याकारणाने एचबी चे प्रमाण नियंत्रित राहते, फॉस्फरस असल्यामुळे शरीरातील आळस थकवा दूर होतो ,फायबरचे प्रमाण जास्त असल्याने बद्धकोष्ठता दूर होते, प्रथिनेचे प्रमाण भरपूर असल्यामुळे मुलांच्या वाढीस मदत करते, रोगप्रतिकारक शक्ती वाढवते, संसर्गाचा धोका कमी होऊन शरीर निरोगी राहण्यास मदत होते.

मुरमुरे... तांदळाच्या लाह्यांपासून तयार झाल्यामुळे आणि फायबरचे प्रमाण जास्त असल्यामुळे पचायला सोपे बद्धकोष्ठतेचा त्रास दूर ,हाडे मजबूत होणे ,ऊर्जा वाढणे, वजन नियंत्रित ठेवणे, त्वचेच्या समस्यांना दूर ठेवणे ,भरपूर प्रमाणात खनिजे आणि जीवनसत्वे असल्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढणे इत्यादी मदत होते .

टरबूज.. जीवनसत्वे ,खनिजे असल्यामुळे उन्हाळ्यामध्ये अतिशय गुणकारी असे हे फळ ताणतणाव दूर ठेवणे, डोके शांत ठेवणे, पाण्याची पातळी नियंत्रित ठेवणे,रोगप्रतिकारक शक्ती वाढवणे इत्यादी

विड्याचे पान.. नागवेलीच्या पानाचे तांबूल प्रमाणात सेवन केल्यास पाचक्ररसासह पोषक द्रव्य शोषण्यास मदत करते,अनेक आजारांवर जसे पित्त, अपचन ,पोट साफ न होणे, सर्दी खोकला ,तोंड येणे, गुडघेदुखी ,टाच दुखी, साखरेची पातळी नियंत्रित ठेवणे, मुखदुर्गंधी दूर ठेवते अशा अनेक आजारावर रामबाण उपाय/ उपयुक्त ठरते ..

अशाप्रकारे तीव्र उणाला सामोरे जाण्यासाठी आणि जीवनात आनंद मिसळण्यासाठी सन समारंभ वैज्ञानिक दृष्टीने पाहता उपयुक्त ठरते .=ज₹१=ज₹१

चैत्रगौरी संपदा घेऊनी आली सदनी ...
आरोग्य संपन्न आनंद दाटला मनी...

**– अश्विनी वासुदेवराव टेकाळे (जोशी), चंपावती माध्यमिक विद्यालय, बीड.**

# बायो–क्लॉक

जेव्हा आपल्याला पहाटे लवकर प्रवास करायचा असेल, तेव्हा आपण सकाळी ४ वाजता गजर लावतो आणि झोपतो. पण बऱ्याच वेळा, गजर न लावता देखील आपण ठरलेल्या वेळेला जागे होतो.

यालाच बायो–क्लॉक म्हणतात. बऱ्याच लोकांचा विश्वास असतो की माणसाचे आयुष्य सरासरी ८०–९० वर्षांपर्यंत असते.

तसेच ५०–६० वर्षांनंतर आजार सुरू होतात असेही त्यांना ठामपणे वाटते.

ही मानसिकता इतकी खोलवर रुजलेली असते की, नकळत ते स्वतःच आपले बायो–क्लॉक तसेच सेट करतात. म्हणूनच, अनेकांना ५०–६० वयानंतर तब्येतीच्या तक्रारी सुरू होतात.

खरं म्हणजे, आपणच मनाने आपले बायो–क्लॉक चुकीच्या पद्धतीने प्रोग्राम करतो.

चिनी लोकांचे दृष्टिकोन वेगळे आहेत!

चीनमध्ये, अनेक लोक ठामपणे विश्वास ठेवतात की १२० वर्षांपर्यंत ते निरोगी आयुष्य जगू शकतात.

या सकारात्मक मानसिकतेमुळे त्यांचे बायो–क्लॉक तशा प्रकारे सेट झाले आहे.

म्हणूनच! तुमच्या बायो–क्लॉकला पुन्हा सेट करा आणि दीर्घायुष्याचा आनंद घ्या!

हे करा आणि १०० वर्षांपर्यंत आरोग्यदायी जगा!

१. मनाने बायो–क्लॉक सकारात्मक रीतीने सेट करा.

नियमित ध्यानधारणा (मेडिटेशन) केल्यास, आपण किमान १०० वर्षे निरोगी जगू शकतो.

२. ४० ते ९० या वयोगटात कोणताही आजार होणार नाही यावर ठाम विश्वास ठेवा.

वृद्धत्व हे १२० वर्षांनंतरच सुरू होते, असे स्वतःला पटवा.

३. केस पांढरे झाले तरी त्यांना नैसर्गिकरित्या रंगवा.

नेहमी तरुण दिसण्याचा प्रयत्न करा.

कपडेही युवक–युवतींसारखे परिधान करा.

हे तुमचा आत्मविश्वास वाढवेल.

कोणत्याही परिस्थितीत स्वतःला वृद्ध समजू नका.

४. खाण्याच्या वेळी नकारात्मक विचार करू नका.

उदा. हे अन्न भेसळयुक्त आहे, अपायकारक आहे असे विचार टाळा.

त्याऐवजी ठामपणे विश्वास ठेवा की –

ध्यानधारणेच्या सामर्थ्याने मी घेतलेले अन्न शुद्ध होत आहे आणि माझ्यासाठी अमृतसमान आहे.

हे अन्न मला १२० वर्षांपर्यंत निरोगी आणि दीर्घायुष्य देईल.

अन्यथा, नकारात्मक विचारांमुळे शरीरात घातक एन्झाईम्स तयार होतात, जे पचन आणि आरोग्यास हानीकारक ठरतात.

५. सदैव सक्रिय राहा.

चालण्याऐवजी शक्य असल्यास हलके धावण्याचा (जॉगिंग) प्रयत्न करा.

६. वाढत्या वयानुसार आरोग्य अधिक चांगले होत जाते यावर विश्वास ठेवा.

(हे शास्त्रीयदृष्ट्या खरे आहे!)

७. आनंद आणि आजारपण एकत्र राहू शकत नाहीत.

जिथे आनंद असेल, तिथे आजार टिकू शकत नाही.

म्हणूनच, आनंदी राहा, निरोगी राहा!

रोज विनोदी चित्रपट पाहा आणि मनमोकळं हसा!

८. मी आता म्हातारा/म्हातारी होत आहे असे कधीही बोलू नका, अगदी गंमतीतही नाही!

तुमच्या विचारांतून आणि शब्दांतूनच तुमचे आयुष्य घडते.

बायो–क्लॉक पुन्हा सेट करा आणि दीर्घायुष्य अनुभवा!

दृष्टीकोन बदला, आयुष्य बदलेल!

जगण्याचा आनंद घ्या! आरोग्यम धनसंपदा

पान १ वरून पुढे...

## पालकमंत्री अजितदादा...

अतिशय चांगलं काम केलं होतं याचे साक्षिदार आपण सर्व आहोतच. थोरात साहेबांचा सर्वव्यापी स्वभाव आणि गोरगरीबांना सहजपणे उपलब्ध होणारी नियत त्यांना इतरांपेक्षा वेगळं ठरवते.डॉ.थोरातांचं जे निलंबन झालं आहे ते विशिष्ट आमदाराच्या राजकारणाचा आणि स्थानिक विरोधाचा भाग आहे.मुंदडांच्या मतदारसंघातील असलेल्या थोरातांची लोकांमध्ये होत असलेली प्रतिमा बहुतेक मुंदडांना धोकादायक वाटत आहे म्हणून त्यांच्या विरोधात हा कारवाईप्रपंच झाला. थोरात साहेबांमध्ये स्थानिक आमदाराला बहुतेक प्रतिस्पर्धी दिसत असावा म्हणून त्यांची बदनामी करायचं काम सुरू आहे. सर्वसामन्यांसाठी सहजपणे उपलब्ध होणारा आणि गोड वाणीनेच अर्धा उपचार करणारा डॉक्टर या जिल्ह्याने गमावू नये अशी अपेक्षा जनसामान्य जनता पालकमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे करत आहे.

## कृषी विभागातील...

करण्याच्या पाठीमागे निकृष्ठ दर्जाची खते, बियाणे, औषधे आणि किटकनाशाके, सूक्ष्म मुलद्रव्ये, प्रजैवके (झत्रऋ), झठजच् इत्यादीचा पुरवठा कंपन्या व कृषि विभागातील अधिकारी शेतकऱ्यांच्या माथी मारत आहेत. तसेच कंपन्या निरनिराळे प्रलोभने देऊन शेतकऱ्यांना मुख्य खते (युरीया, डीएपी इत्यादी) सोबत लिंकिंग मध्ये ही निकृष्ठ दर्जाची खते घेण्यास भाग पडत आहेत. त्यासाठी गाव पातळीवरील कृषि निविष्ठा विक्री केंद्रे व कंपनी पातळीवरील विक्री काम पाहणारे किंवा उत्पादन केलेला माल खपविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत आणि शेतकरी कर्ज काढून उत्पन्न जास्त यईल या आशेने या निविष्ठा घेत आहेत, गेल्या १० वर्षा पासून चढत्या क्रमाने बोगस खते, बियाणे, औषधे उत्पदान करणाऱ्या कंपन्यांचे प्रमाण वाढलेले आहे. त्यामुळे शेतकरी वर्गाचा उत्पादन खर्च वाढत आहे. हवामान व पावसाचे अनिश्चिततेमुळे अपेक्षित उत्पादन शेतीमधून मिळत नाही उत्पन्न आल्यानंतर त्याचा बाजारात योग्य भाव मिळत नाही, त्यामुळे

पान १ वरून पुढे...

शेतकरी आत्महत्याचे प्रमाण महाराष्ट्रामध्ये वाढू लागलेले आहे ही एक वस्तुस्थिती आहे.

निकृष्ट दर्जाच्या या खते बियाणे औषधे आणि निविष्ठा उत्पादन करणाऱ्या कंपन्यांवर योग्य दर्जा आणि गुणवत्ता पूर्ण निविष्ठा उत्पादन होणार आहे याचे नियंत्रण करण्याचे मुख्य काम कृषी विभागाचे आहे. एका जिल्ह्यामध्ये कृषी विभागामार्फत गुणनियंत्रणाच्या कामासाठी प्रत्येक तालुक्याला कार्यरत असणारे तालुका कृषी अधिकारी, पंचायत समिती मधील कृषी अधिकारी, उपविभागीय पातळीवर उपविभागीय कृषी अधिकारी, जिल्हा पातळीवर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जिल्ह्यात जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या कार्यालयातील कृषी उपसंचालक व पूर्णवेळ जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, जिल्हा परिषदेकडील कृषी विकास अधिकारी आणि जिल्हा परिषदेकडील मोहीम अधिकारी, विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयातील विभागीय गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, विभागीय तंत्र अधिकारी गुन नियंत्रण इत्यादी अधिकारी कर्मचारी काम करीत आहेत. विभागीय कृषी सहसंचालक छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील तंत्र अधिकारी गुणनियंत्रण, विभागीय गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक हे सुद्धा क्वालिटी कंट्रोल इन्स्पेक्टर आहेत.

या सर्वांनी बदली करीता मंत्री कार्यालयात मोठ्या प्रमाणात रकमा देऊन बदली करून घेतली असल्याने ३ वर्षात १० पट रक्कम वसूल करण्याचा हेतूने हे सर्व क्वालिटी कंट्रोल इन्स्पेक्टर स्वतःचे काम सोडून आणि शेतकऱ्याला गुणवत्ता पूर्ण निविष्ठा पुरवठा करण्यासाठी निरीक्षण करण्याचे सोडून हप्ते गोळा करण्यामध्ये गुंतलेले असतात. विक्री केंद्रे तपासणीला गेल्यावर तपासणी फी, नमुना काढल्यास त्याची फी वेगळी असते, या सर्व हप्तेखोरपणामुळे कृषी निविष्ठा विक्री केंद्राचे मालक शेतकऱ्याला देण्यात येणाऱ्या निविष्ठाच्या किमतीपेक्षा जास्तीचे कमिशन (४०% ते ५०%) मिळविण्याच्या हेतूने बोगस कंपन्यांचा माल खपविण्याकडे त्यांचा कल जास्त असतो. त्यामुळे शेतकऱ्यांना गुणवत्ता पूर्ण निविष्ठा मिळत नाहीत.

किरण जाधव यांना पुन्हा पुन्हा गुन्हा नियंत्रण विभागातच कशी

पान १ वरून पुढे...

पदस्थापना देण्यात आली याची देखील सखोल चौकशी करण्यात यावी.

किरण जाधव कार्यरत असताना त्यांचे नियंत्रण अधिकारी दिलीप झेंडे व विकास पाटील हे जरी सेवानिवृत्त झाले आले तरी. त्यांच्या व त्यांच्या नातेवाईकांच्या मालमत्तेची सुद्धा उघड चौकशी लाच लचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यात यावी.महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाचे खते बियाणे औषधे व इतर कृषी निवेष्ठांचे पुरवठादार यांच्या गेल्या १५ वर्षातील आर्थिक व्यवहाराची तपासणी आयकर विभागामार्फत करण्यात यावी अशी मागणी ही त्यांनी शेवटी केली.

## ती दारुची नशा नव्हे..

चालवावे, अशी मागणी आंदोलनकर्त्यांची असून बंदमध्ये गेवराईकरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सदरच्या निंदनीय घटनेचा जाहीर निषेध केला. गेवराई शहरामध्ये बंद दरम्यान कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

ती दारुची नशा नव्हे धर्मांधतेचा विचार– आ. धस, तो दारुड्या नव्हे, आतंकवादीच!

अर्धमसल्यात गव्हाणे आणि सागडे या दोघांनी ज्या पद्धतीने आणि ज्या विचाराने जिलेटीन लावून मस्जिद उडवून देण्याचा प्रयत्न केला, मस्जिदमध्ये स्फोट घडवून आणला ते कृत्य दहशतवादी आणि आतंकवादीच असे असताना आष्टी–पाटोद्याचे आमदार सुरेश धस यांनी बेजबाबदारपणे काल वक्तव्य केले. तो स्फोट त्या लोकांनी व्यक्तिगत कारणातून केला, ते दारुडे आहेत, त्याच्यामागे कोणी मास्टरमाइंड नाहीत, अशी बेताल बडबडही धसांनी केली. परंतु सदरचे प्रकरण अत्यंत गंभीर आहे. जे लोक तुमची मस्जिद काढा नाहीतर आम्ही उडवून देऊ, अशी धमकी देतात याचाच अर्थ हे नशेत नव्हेतर धर्मांधतेच्या विचारात घडवून आणलेली घयना मानावी लागेल. सुरेश धसांनी घटनास्थळी जावून पाहणी करायला हवी होती, नंतर धसांनी यावर भाष्य केलं असतं तर अधिक बरं झालं असतं, परंतु ज्या पद्धतीने धस बरगळले त्यातून मुस्लिम समाजात आणि अन्य समाजातही संताप व्यक्त केला जात आहे.

पान १ वरून पुढे...

## जगातील सर्वात श्रीमंत...

यावेळी आष्टी विधानसभा मतदारसंघाचे विधानसभा सदस्य आमदार सुरेश धस, महादेव दरा देवस्थानचे मठाधिपती कल्याण महाराज कोल्हे, सरपंच परिषदेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, जिल्हा वन अधिकारी अमोल गरकळ,सरपंच नंदकिशोर करांडे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना सयाजी शिंदे म्हणाले की, सध्या पर्यावरणाचा असमतोल झाल्यामुळे श्वास घेणेदेखील मुश्किल झाले असून चांगला श्वास घेणारा माणूस हा जगातील सर्वात श्रीमंत माणूस आहे असे मी समजतो त्यामुळे जगात आई आणि वृक्ष या दोघांचे अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे सांगत ते म्हणाले की, हे रचनात्मक कार्य असून त्यामुळे देवराई च्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रभर याविषयी आपण काम करत आहोत आमदार सुरेश धस यांनी याविषयी संपर्क केल्यामुळे मी या ठिकाणी आलो असून आपण माणूस म्हणून सर्व गोष्टींकडे पाहिले पाहिजे असे सांगत जात धर्म पंथ विरहित रचनात्मक कार्य आपण करत असून आष्टी तालुक्यातील महादेव दरा देवराई च्या माध्यमातून या ठिकाणी अत्यंत दर्जेदार वृक्षांची लागवड करून त्यामध्ये आंबा,चिंच,विविध प्रकारचे गवते यासारख्या देशी वृक्षांची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्यात येईल ज्या देशांमध्ये या प्रकारची झाडे आहेत तो देश जगात श्रीमंत देश समजला जाणार आहे महादेव जरा वन देवराई हेदेखील अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प समजून पशुपक्ष्यांसाठी विघातक असलेल्या नावाची वनस्पती चे समूळ उच्चाटन करून या ठिकाणी दर्जेदार वृक्षांची लागवड करण्यात येईल सुरुवातीला एप्रिल महिन्यामध्ये देवराई संस्थेचे तज्ञ येऊन या ठिकाणी पाहणी करतील सर्वेक्षण करतील आणि त्यानंतर प्रत्यक्ष काम सुरुवात होणार आहे.बीडसांगवी येथील महादेव दरा या ठिकाणी देवराई च्या माध्यमातून पशुपक्ष्यांसाठी विषारी ठरणाऱ्या ग्लॅरीसिडिया या वनस्पतीचे समूळ उच्चाटन करण्यात येणार असून देशी वृक्ष असलेल्या आंबा चिंच मोठ्या प्रमाणावर झाडांची लागवड करण्यात येणार आहे.

पान ४ वरून पुढे...

## आश्रम शाळेतील...

आश्रम शाळेचे प्राचार्य आर डी पवार, मुख्याध्यापक चव्हाण सर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन आणि प्रतिमा पूजन करून झाले. सेवापुर्ती निमित्त श्री शिंदे दत्तात्रय सखाराम यांचा सपत्नीक भव्य दिव्य सत्कार सत्कार करण्यात आला. यावेळी शाल फेटा श्रीफळ सन्मानपत्र व शाळेच्या वतीने ५५ इंची एलईडी टीव्ही सप्रेम भेट देऊन शिंदे सरांना सन्मानित करण्यात आले. शिंदे सरांविषयी भावोद्गार करताना दिनेश पवार साहेब म्हणाले की, सुरुवातीच्या कठीण काळामध्ये मी शाळा सुरू केली तेव्हा शिंदे सर सारखे चांगले सहकारी मला मिळाले, व त्यांच्या अपार कष्टामुळे मी हे फार मोठे शैक्षणिक संकुल उभा करू शकलो अशा अनेक आठवणींना उजाळा देत पवार साहेबांनी शिंदे सरांना पुढील जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. इतर मागासबहुजन विभाग बीडचे संचालक क्षीरसागर बोलताना म्हणाले की, ज्या भव्य स्वरूपात हा कार्यक्रम संपन्न होत आहे. त्याअर्थी शिंदे सर हे एक अलौकिक व्यक्तिमत्व आहे. सुशील पवार बोलताना म्हणाले की, शिंदे सारख्या ज्येष्ठ सहकार्यामुळे आज माझ्या शाळेचे अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रात नावलौकिक मिळवत आहेत, याचा मला अभिमान आहे. यावेळी शिंदे सरांबद्दल वादे सर, तोंडे सर, माजी विद्यार्थी विजय राठोड, सोलवणकर साहेब, आर डी पवार, चव्हाण सर बी आर राठोड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सत्कार

पान ४ वरून पुढे...

ला प्रत्युत्तर देताना शिंदे सर यांनी आपल्या प्रदीर्घ भाषणामध्ये शाळेच्या सर्व जुन्या आठवणींना उजाळा दिला. संस्थेने दिलेले संधी आणि संस्थेने टाकलेला विश्वास मी सार्थ करू शकलो याचा मला सार्थ अभिमान आहे असे भाऊ उद्गार काढले. संस्थेचे अध्यक्ष दिनेश पवार साहेब यांचा उपकार मी कधी विसरणार नाही व स्टाफ ने दिलेला स्नेह कधी विसरणार नाही असे म्हणताना सरांचा कंठ दाटून आला. त्यांनी आपल्या भाषणात अनेक आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रम प्रसंगी सरांच्या सुविद्ध पत्नी श्री आशाताई शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले सरांचे सुपुत्र डॉक्टर संदीप शिंदे याचे समयोचित भाषण झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नावडे सर, आभार प्रदर्शन एस पी राठोड सर व बहारदार सूत्रसंचालन श्री काळे सर यांनी केले. यावेळी शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शिंदे सर यांचा मित्रपरिवार व परिवारातील अनेक मंडळी उपस्थित होते. शेवटी स्नेहभोजनाने कार्यक्रमाचे सांगता झाली.

## महायुती सरकारने...

देशोधडीला लावण्याचे काम केले आहे. याउलट देशातील व राज्यातील उद्योगपतींना केंद्र व राज्य सरकार कडून न मागता हजारो कोटींची कर्जमाफी देण्यात आली असून हे सरकार सर्व सामान्य शेतकरी, जनतेचे नसून उद्योगपतींचे आहे अशा संकटाच्या काळात शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्ष शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीर पणे उभे

पान ४ वरून पुढे...

राहणार असून त्यांना कर्जमुक्ती मिळवून देण्यासाठी मोठे जनआंदोलन उभे करणार आहे. असे प्रसिदीस दिलेल्या पत्रकात शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास प्रकाशराव गिराम यांनी म्हटले आहे.

## डॉ. ज्योती ढगे...

वाटचालीसाठी महत्त्वपूर्ण पाठिंबा व मार्गदर्शन दिले. त्यांचे सासर गेवराई तालुक्यातील टाकाळगाव हे असून, माहेर अंबेजोगाई येथील मोरवाडी आहे. त्यांचे सासरे श्री. रोहिदास ढगे आणि सासू श्रीमती मदालसा ढगे यांनी नेहमीच त्यांना प्रोत्साहित करून त्यांच्या स्वप्नांना उंच भरारी देण्याचे बळ दिले.

## माजलगाव तालुक्यात ...

अंदाजे १२हजार,२ग्राम वजनाचे कुडके व हुजुर किंमत अंदाजे ८हजार,चांदीचे जोडवे प्रति १०ग्राम वजानाचे ४जोड किंमत अंदाजे ५०हजार, चांदीचे बाजुबंद, कमरेचा छावा,बांगड्या ४०ग्राम वजनाचे किंमत अंदाजे २०हजार रुपये. नगदी रक्कम १२हजार असे मिळुन ५लाख ३७हजार रुपयांच्या मुद्देमालाची चोरी करून चोरट्याने पोबारा केला अश्या फिर्यादी वरून अज्ञात चोरटया विरोधात भान्यासं –२०२३चे ३३१(३),३०५(अ)अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढिल तपास पोउपनि उद्धव चव्हाण करीत आहेत.


## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एस. जगताप, दिवाणी न्यायाधिश साहेब, (क. स्तर), शिरुर कासार, यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं. ७३ /२९२५, सोनाली व ईतर विरुध्द निल.**

अर्जदार :– १) सोनाली भ्र. जालिंदर शेळके वय २६ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. नांदेवली, ता. शिरुर कासार, जि. बीड, २) संस्कृती पि. जालिंदर शेळके वय ०७ वर्षे, धंदा शिक्षण, रा. सदर. अ.पा.क. आई अर्जदार क्र. १. ३) स्वरा पि. जालिंदर शेळके वय ०४ वर्षे, धंदा शिक्षण, रा. सदर. अ.पा.क. आई अर्जदार क्र. १,

विरुध्द निल

**अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत..**

ज्यापेक्षा मयत नामे जालिंदर पि. मोहन शेळके रा. नांदेवली, ता. शिरुर का., जि. बीड, येथील रहिवाशी असुन ते दि. २९/०७/२०२३ रोजी जिल्हा रुग्णालय, बीड, ता. जि. बीड, येथे अर्जदारांचे राहते घरी मयत झालेल्या असुन अर्जदार क्र. १ हि मयताची पत्नि असुन अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे अज्ञान आपत्ये आहेत. तसेच अर्जदार हे उपारोक्त मयताचे कायदेशीर वारस आहेत. असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मदतील कोणी योग्य हरकती मुदतीत न कळविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे हक्का बद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयताचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. २१/०३/२०२५ रोजी माझ्या सहीने न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख – २३/०४/२०२५

**(ॲड, एच, एस, कोठुळे)**

**आदेशावरून.**

**(स्वाक्षरीत)** **शिक्का** **(स्वाक्षरीत)**

**क.लिपीक** **सहाय्यक अधीक्षक**

**दिवाणी न्यायालय, व.स्तर, शिरूर का.**


Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे,** E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# जि.प.प्रा. शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

वडवणी शहरातील जि.प.प्राथमिक शाळा सरकारखोरी तांडा येथे २८ मार्च २०२५ गुरूवार रोजी सायंकाळी प्रथम वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या थाटामाटात संपन्न झाले. यावेळी शाळेतील चिमुकल्यांनी वेगवेगळ्या गाण्यांवर सदाबहार असे नृत्य सादर केले व उपस्थितांचे मने जिंकली. उपस्थित रसिक प्रेक्षकांनी यावेळी चिमुकल्यांवर पारितोषिकांचा वर्षाव केला. अतिशय सुंदर प्रकारे हे स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन तसेच दिपप्रज्वलन करून या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन वडवणीनगरीचे उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे म्हणाले आपल्या मुलांचे सप्तगुण ओळखा त्याला चालना द्या त्यामध्ये ते करियर करू शकतात वार्षिक संमेलनातून विद्यार्थ्यांच्या सप्त गुणांना चालना मिळते उसाकडे न वळता विद्यार्थ्यांना सुशिक्षित घडवा असे बोलून दोन-चार जनाचे उदाहरण देखील भाऊंनी दिले व शाळेला शुभेच्छा दिल्या.. या कार्यक्रमात विविध मराठी, हिंदी, बंजारा गीत, बंजारा नृत्य बालकलाकारांनी वैयक्तिक, सामुहिक नृत्य, नाटक, गीतगायन सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक गिन्यानदेव राठोड, युवा नेते दत्तात्रय जमाले, जेष्ठ नागरिक हरी पवार जेष्ठ नागरिक रावसाहेब पवार, पत्रकार संभाजी लांडे, निलेश चव्हाण, केंद्रप्रमुख धनवे बापू, रोहिदास चव्हाण, बंकट काळे सर, पांडुरंग आडे, अंगत रेडी सर, रघुनाथ यादव सर, वाघमारे सर हे होते.

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एस. जगताप, दिवाणी न्यायाधिश साहेब, (क. स्तर), शिरुर कासार, यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं. १०० /२०२५, राम व एक विरुध्द निल**

अर्जदार :- १ ) राम पि. उत्तम कवादे वय ४८ वर्षे, धंदा शेती, रा. राक्षसभुवन, ता. शिरुर कासार, जि. बीड, २) आण्णा पि. उत्तम कवादे वय ४४ वर्षे, धंदा शेती, रा. सदर. मो. नं. ९९२३४८६२१९.

विरुध्द निल

**अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्यापेक्षा मयत नामे रेऊंबाई भ्र. उत्तम कवादे रा. राक्षसभुवन, ता. शिरुर का., जि. बीड, येथील रहिवाशी असुन ते दि. १५/०४/२०२४ रोजी मौजे राक्षसभुवन, ता. शिरुर कासार, जि. बीड, येथे अर्जदारांचे राहते घरी मयत झालेल्या असुन अर्जदार क्र. १ व २ हे मयताचे मुले आहेत. तसेच अर्जदार हे उपारोक्त मयताचे कायदेशीर वारस आहेत. असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मदतील कोणी योग्य हरकती मुदतीत न कळविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे हक्का बद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयताचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि. २१/०३/२०२५ रोजी माझ्या सहीने न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख - ०८/०५/२०२५

**(ॲड. एच. एस. कोठुळे.)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**(स्वाक्षरीत)** शिक्का **सहाय्यक अधीक्षक**
**क.लिपीक** **दिवाणी न्यायालय, व.स्तर, शिरूर का.**

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एस. जगताप, दिवाणी न्यायाधिश साहेब, (क. स्तर), शिरुर कासार, यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं.१०१/२०२५ , जयश्री व ईतर विरुध्द निल.**

अर्जदार :- १) जयश्री भ्र. कनलाल ऊर्फ कन्नालाल खामकर वय ३८ वर्ष, धंदा घरकाम व शेती, रा. खामकरवाडी तहत सावरगाव (चकला), ता. शिरुर कासार, जि. बीड,

२) किर्ती पि. कनलाल खामकर वय १८ वर्षे, धंदा शिक्षण, रा. सदर.

३) वैभव पि. कनलाल खामकर वय १७ वर्षे, धंदा शिक्षण, रा. सदर. मो. नं. ९४२३३०५९८५. विरुध्द

निल

**अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत**

ज्यापेक्षा मयत नामे कनलाल ऊर्फ कन्नालाल पि. पांडुरंग खामकर रा. खामकरवाडी तहत सावरगाव (चकला), ता. शिरुर का., जि. बीड, येथील रहिवाशी असुन ते दि. २१/११/२०२४ रोजी मौजे खामकरवाडी तहत सावरगाव (चकला), ता. शिरुर कासार, जि. बीड, येथे अर्जदारांचे राहते घरी मयत झालेल्या असुन अर्जदार क्र. १ हि मयताची पत्नि असुन अर्जदार क्र. २ हि मयताची मुलगी आहे तसेच अर्जदार क्र. ३ हा मयताचा अज्ञान मुलगा आहे. तसेच अर्जदार हे उपारोक्त मयताचे कायदेशीर वारस आहेत. असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे. असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मदतील कोणी योग्य हरकती मुदतीत न कळविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे हक्का बद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयताचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. २१/०३/२०२५ रोजी माझ्या सहीने न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख ०८/०५/२०२५

**(ॲड. एच. एस. कोठुळे.)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**(स्वाक्षरीत)** शिक्का **सहाय्यक अधीक्षक**
**क.लिपीक** **दिवाणी न्यायालय, व.स्तर, शिरूर का.**

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एस. जगताप, दिवाणी न्यायाधिश साहेब, (क. स्तर), शिरुर कासार, यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं. १०२/२०२५ , जनाबाई वगैरे विरुध्द निल**

अर्जदार :- १) जनाबाई भ्र. भानुदास बहिर वय ६० वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. शिरापुर धुमाळ, ता. शिरुर कासार, जि. बीड, २) कल्याण पि. भानुदास बहिर वय ३७ वर्षे, धंदा शेती, रा. सदर. मो. नं. ९८२३२५०२७४. ३) सुरेखा भ्र. दादासाहेब लाटे वय ४२ वर्षे, धंदा घरकाम, रा. बेलुरा, ता. जि. बीड, ह. मु. बालाजी कॉलणी, विठ्ठल नगर, स. नं. ४५, हिंगे बिल्डिंग जवळ, वार जे माळवाडी, पुणे शहर, वारजे पुणे, ४११ ०५८. ४) मंदा भ्र. अशोक गवते वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. बेलुरा, ता. जि. बीड, ५) राधा भ्र. चंद्रकांत पौळ वय ३३ वर्षे, धंदा घरकाम, रा. सुशि, ता. गेवराई, जि. बीड.

विरुध्द निल

**अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्यापेक्षा मयंत नामे भाणुदास पि. धोंडीबा बहिरा, शिरापुर धुमाळ, ता. शिरुर का., जि. बीड, येथील रहिवाशी असुन ते दि. ०७/०३/२०२२ रोजी माई मंगेशकर हॉस्पिटल, पुणे, पुणे शहर पुणे, येथे मयत झालेले असुन अर्जदार क्र. १ हि मयताची पत्नि असुन अर्जदार क्र. २ हा अज्ञान मुलगा असुन अर्जदार क्र. ३ ते ५ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. तसेच अर्जदार हे उपारोक्त मयताचे कायदेशीर वारस आहेत. असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मदतील कोणी योग्य हरकती मुदतीत न कळविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे हक्का बद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयताचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि २१/०३/२०२५ रोजी माझ्या सहीने न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख - ०८/०५/२०२५

**(ॲड. एच. एस. कोठुळे.)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**(स्वाक्षरीत)** शिक्का **सहाय्यक अधीक्षक**
**क.लिपीक** **दिवाणी न्यायालय, व.स्तर, शिरूर का.**

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एस. जगताप, दिवाणी न्यायाधिश साहेब, (क. स्तर), शिरुर कासार, यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं. १०३/२०२५, सुमन व ईतर विरुध्द निल.**

अर्जदार :- १) सुमन भ्र. नामदेव सटले वय ७५ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. वरंगळवाडी तहत निमगाव (मां.), ता. शिरुर कासार, जि. बीड, २) सुखदेव पि. नामदेव सटले वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. सदर. मो. नं. ८९९९७६७१७४. ३) मिरा भ्र. शंकर गायकवड वय ४५ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. आनंदवाडी तहत तिंतरवणी, ता. शिरुर का., जि. बीड, ४) जनाबाई भ्र. उध्दव गायकवाड वय ३२ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. मौजपुरी, ता. जि. जालना

विरुध्द निल

**अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत**

ज्यापेक्षा मयत नामे नामदेव पि. मारुती सटले रा. वरंगळवाडी तहत निमगाव (मां.), ता. शिरुर का., जि. बीड, येथील रहिवाशी असुन ते दि. ११/०२/२०२४ रोजी मौजे वरंगळवाडी तहत निमगाव (मां.), ता. शिरुर कासार, जि. बीड, येथे अर्जदारांचे राहते घरी मयत झालेल्या असुन अर्जदार क्र. १ हि मयताची पत्नि असुन अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा आहे. तसेच असुन अर्जदार क्र. ३ व ४ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. तसेच अर्जदार हे उपारोक्त मयताचे कायदेशीर वारस आहेत. असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मदतील कोणी योग्य हरकती मुदतीत न कळविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे हक्का बद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयताचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. २१/०३/२०२५ रोजी माझ्या सहीने न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख - ०८/०३/२०२५

**(ॲड. एच. एस. कोठुळे.)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**(स्वाक्षरीत)** शिक्का **सहाय्यक अधीक्षक**
**क.लिपीक** **दिवाणी न्यायालय, व.स्तर, शिरूर का.**

## जाहीर प्रगटन

**श्री. एन. एम. वाली, दिवाणी न्यायाधिश क. स्तर, धारुर यांचे न्यायालयात**

**दिवाणी चौकशी अर्ज क्र. १०३ / २०२५, निशाणी क्र. ११ / ड**

अर्जदार - १) अशोक पि. गोपीनाथराव रेपे, वय ५७ वर्षे, धंदा नौकरी रा. अंजनडोह ता. धारूर जि. बीड. ह. मु. उदयनगर, धारूर ता.धारूर जि. बीड, २)शिवाजी पि. गोपीनाथ रेपे, वय ४८ वर्षे, धंदा शेती रा. अंजनडोह ता. धारुर जि. बीड. ३)यशोदा भ्र. दत्तात्रय दौंड, वय ५४ वर्षे ,धंदा घरकाम रा. सावळेश्वर ता. केज जि.बीड, ४)इंदुबाई भ्र. वशिष्ट शिनगारे, वय ५१ वर्षे, धंदा घरकाम रा. कसबा विभाग, धारुर ता. धारुर जि. बीड. विरुध्द

सामनेवाला - कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहिरनामा / जाहिरनोटीस द्रवारे असे कळविण्यात येते की, ज्या पेक्षा मयत **गोपीनाथ पिता पांडुरंग रेपे** रा. अंजनडोह ता. धारुर जि. बीड यांचे दिनांक २४/०१/२०२५ रोजी मौजे विवेकानंद दवाखाना लातुर ता. जि. लातुर येथे निधन झालेले आहे. त्यांना अर्जदार हे एकमेव कायदेशीर वारसदार आहेत. मयत **गोपीनाथ पिता पांडुरंग रेपे** यांचे पश्चात शासकिय / निमशासकिय व इतर कार्यालयीन कामासाठी अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता अर्जदार हे मयत गोपीनाथ पिता पांडुरंग रेपे यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करुन वारस प्रमाणपत्र देणे बाबत कुणाचीही अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी हि जाहिर नोटीस प्रसिध्द झालेले तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वत: अथवा या मे. न्यायालयात प्रत्यक्ष अथवा वकिलांमार्फत हजर होउन लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीम ध्ये हरकत दाखल केल्या नाही, तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करुन पुरावाव घेउन मे न्यायालयात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

आज तारीख २४/०३/२०२५ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिला.

प्रकरणात पुढील दिनांक : ०३/०५/२०२५

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**(स्वाक्षरीत)** शिक्का **सहाय्यक अधीक्षक**
**क.लिपीक** **दिवाणी न्यायालय, व.स्तर, धारूर**

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एस. पी. वानखडे यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ३२८/२०२५,**
**शिराबाई भ्र. अंबादास पवार व ईतर विरूध्द निरंक**

ज्याअर्थी मयत नामे अंबादास पि. मुक्ता पवार हे / हया दिनांक २७/०१/२००१ रोजी मौजे रूई, ता. गेवराई, जि. बीड, येथे मयत झाले / झाल्या आहेत. अर्जदार क. १ शिराबाई भ्र. अंबादास पवार, वय- ७५ वर्षे, धंदा - शेती, रा. रूई, ता. गेवराई, जि. बीड, २. कचरू पि. अंबादास पवार, वय - ४७ वर्षे, धंदा - शेती, रा. सदर, ३. सुनिता भ्र. विनायक खरवडे, वय- ६७ वर्षे, धंदा- शेती, रा. सदर, ४. मिना भ्र. शिवाजी खरवडे, वय - ४६ वर्षे, धंदा- शेती, रा. सदर, ५. अनुराधा भ्र. सुर्यकांत तळेकर, वय-- ३९ वर्षे, धंदा- शेती, रा. सदर, यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आह करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयन अंबादास पि. मुक्ता पवार यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २८/०३/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. पुढील तारीख १०/०६/२०२५

**(मार्फत ॲड. वाय. एस. टेकाडे, गेवराई)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**(स्वाक्षरीत)** शिक्का **सहाय्यक अधीक्षक**
**क.लिपीक** **दिवाणी न्यायालय, व.स्तर, गेवराई**

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**श्री. आर.आर. जाधव ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गेवराई गेवराई, जि.बीड यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२७७/२०२५, शहनाजबी व ईतर २ वि. निरंक**

ज्याअर्थी मयत **शेख बाबु शेख अब्दुल, रा. मौजे संजयनगर, गेवराई, ता. गेवराई, जि. बीड** हे दिनांक ०२/०९/२०२१ रोजी कसबे संजयनगर, गेवराई, ता. गेवराई, जि. बीड यथ मयत झाले.

अर्जदार : १) शहनाजबी बाबु शेख, वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. संजयनगर, गेवराई, ता. गेवराई, जि. बीड. २) शेख अमन शेख बाबु, वय ३४ वर्षे, धंदा मजुरी, रा. संजयनगर, गेवराई, ता गेवराई, जि. बीढ ३) समिर बाबू शेख, वय ३१ वर्षे, धंदा मजुरी, रा.संजयनगर, गेवराई, ता. गेवराई, जि.बीड

ज्याअर्थी अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे कला आहे

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसांचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुण असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी याग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर भयत नामे शेख बाबु शेख अब्दुल, रा. मौजे संजयनगर, गेवराई, ता. गेवराई, जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक २०/०३ /२०२५ माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ०३/०५/२५

**(मार्फत- ॲड. एस. बी. भंडारी, गेवराई)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**(स्वाक्षरीत)** शिक्का **सहाय्यक अधीक्षक**
**क.लिपीक** **दिवाणी न्यायालय, व.स्तर, गेवराई**

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि.बीड येथील २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एन. ए. रणदिवे यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ३१५/२०२५, तारा पोपट कापसे वि निरंक**

ज्याअर्थी मयत नामे **पोपट पि. दशरथ कापसे रा. उमापूर, ता. गेवराई जि. बीड हे/ हया दिनांक १७/१२/२०२४** रोजी इंद्रायणी हॉस्पिटल ॲण्ड कॅन्सर इंस्टिट्युट, आळंदी ता. खेड जि. पुणे येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क्र. १ तारा भ्र. पोपट कापसे अर्जदार क. २ जितेंद्र पि. पोपट कापसे, अर्जदार क्र. ३ विजय पि. पोपट कापसे व अर्जदार क. ४ अमर पि. पोपट कापसे सर्व रा. उमापूर ता. गेवराई जि. बीड ह. मु. सर्व्हे नं. ८८/१, रामगड आळंदी रोड, ब्रीनीटी स्कुल जवळ, कळस माळवाडी रोड पुणे, दिघी कॅम्प, पुणे शहर, ता. जि. पुणे ४११०१५ यांनी शासकीय/निमशासकीय काम काजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या व गैरअर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे पोपट पि. दशरथ कापसे रा. उमापूर, ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०१/०४/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ०९/०६/२०२५

**(मार्फत ॲड. एस. बी. भंडारी गेवराई)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**(स्वाक्षरीत)** शिक्का **सहाय्यक अधीक्षक**
**क.लिपीक** **दिवाणी न्यायालय, व.स्तर, गेवराई**

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**श्री. आर.आर. जाधव ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गेवराई ,गेवराई, जि. बीड यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज क.३२७/२०२५ कल्पना व ईतर २ वि. निरंक**

ज्याअर्थी **मयत कुशाराम पि श्रीकिसन राऊत, रा. मौजे तलवाडा, ता. गेवराई, जि. बीड हे दिनांक ०६/०८/२०१२ रोजी उरुळी कांचन, पुणे** येथे मयत झाले.

अर्जदार : १) कल्पना भ्र. कुशाराम राऊत, वय ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. तलवाडा, ता. गेवराई, जि.बीड है. मु. संभाजी तुपे चाळ समोर, तुपे वस्ती, उरुळी कांचन, पुणे. २) सौरभ पि. कुशाराम राऊत, वय २० वर्षे, धंदा शिक्षण, रा. तलवाडा, ता. गेवराई, जि. बीड. ह.म संभाजी तुपे चाळ समोर, तुपे वस्ती, उरुळी कांचन, पुणे. ३) गौरव पि.कुशाराम राऊत, वय १८ वर्षे, धंदा शिक्षण, रा.तलवाडा, ता. गेवराई, जि.बीड. ह.म संभाजी तुपे चाळ समोर, तुपे वस्ती, उरुळी कांचन, पुणे.

ज्याअर्थी अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे काणाने म्हणणं असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसांचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुण असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत **नामे कुशाराम पि.श्रीकिसन राऊत, रा. मौजे तलवाडा, ता. गेवराई, जि. बीड** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनाक २९/०३/२०२५ माझ्या सही व शिक्यानिशी दिले. पुढील तारीख ०७/०५/२५

**(मार्फत ॲड. एस. बी. भंडारी, गेवराई)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**(स्वाक्षरीत)** शिक्का **सहाय्यक अधीक्षक**
**क.लिपीक** **दिवाणी न्यायालय, व.स्तर, गेवराई**

## जाहीर प्रगटन

**श्री. एन. एम. वाली, दिवाणी न्यायाधिश क. स्तर, धारुर यांचे न्यायालयात**

**दिवाणी चौकशी अर्ज क्र. ९७/२०२५ निशाणी क. ०८/ ड**

अर्जदार - प्रदिप पिता जानेश्वर मदने वय २४ वर्षे धंदा शिक्षण व शेती रा. व्हरकटवाडी ता. धारूर जि. बीड. विरुध्द

सामनेवाला - कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहिरनामा / जाहिरनोटीस द्रवारे असे कळविण्यात येते की, ज्या पेक्षा मयत १. ज्ञानेश्वर पिता गजबा मदने रा. व्हरकटवाडी ता. धारुर जि. बीड यांचे दिनांक १६/०८/२०१५ रोजी मौजे यशवंतराव चव्हाण ग्रामीण रूग्णालय, लातुर ता. जि. लातुर येथे निधन झालेले आहे व २. लता भ्र. वाडी ज्ञानेश्वर मदने रा. ता. धारुर जि. बीड यांचे दिनांक २०/०८/२०१६ रोजी मौजे व्हरकटवाडी ता. धारुर जि. बीड येथे निधन झालेले आहे. त्यांना अर्जदार हे एकमेव कायदेशीर वारसदार आहेत.

मयत १. ज्ञानेश्वर पिता गजबा मदने व २. लता भ्र. ज्ञानेश्वर मदने यांचे पश्चात शासकिय / निमशासकिय व इतर कार्यालयीन कामासाठी अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता अर्जदार हे मयत १. ज्ञानेश्वर पिता गजबा मदने व २. लता भ्र. ज्ञानेश्वर मदने यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करुन वारस प्रमाणपत्र देणे बाबत कुणाचीही अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी हि जाहिर नोटीस प्रसिध्द झालेले तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे. न्यायालयात प्रत्यक्ष अथवा वकिलांमार्फत हजर होउन लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही, तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करुन पुरावाव घेउन मे. न्यायालयात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. आज तारीख २४/०३/२०२५ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिला. प्रकरणात पुढील दिनांक : ०२/०५/२०२५

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**(स्वाक्षरीत)** शिक्का **सहाय्यक अधीक्षक**
**क.लिपीक** **दिवाणी न्यायालय, व.स्तर, धारूर**

## जाहीर प्रगटन

**धारुर येथील श्रीमती नुतन सचिन कदम सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर धारुर**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ९५/२०२५ सरस्वती खुशालराम रेपे वि निरंक.**

मयताचे नाव : मयत खुशालराम पिता शेषेराव रेपे मौजे रेपेवाडी ता. धारूर जि. बीड हे दि. १५/०४/२०२५ रोजी मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारस अर्जदार

१. सरस्वती भ्र. खुशालराम रेपे, वय ५५ वर्षे, धंदा घरकाम रा. रेपेवाडी ता.धारूर जि. बीड, २. निवृत्ती पिता खुशालराम रेपे, वय ३० वर्षे, धंदा शेती रा. रेपेवाडी ता.धारूर जि. बीड, ३. अशोक पिता खुशालराम रेपे, वय २१ वर्षे, धंदा शिक्षण रा. रेपेवाडी ता. धारूर जि. बीड)

यांनी या न्यायालयास **मयत खुशालराम पिता शेषेराव रेपे** मौजे रेपेवाडी ता. धारूर जि. बीड हे मयत झाले असून त्यांच्या पश्चात अर्जदारास शासकीय योजनेचा लाभ ६ कोण्याकरीता, व इतर महत्त्वाच्या कामकाजाकरीता, अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा अर्जदार

सदरहु अर्जदार मयताचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत- खुशालराम पिता शेषेराव रेपे मौजे रेपेवाडी ता.धारुर जि. बीड यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक : २१/०३/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. पुढील तारीख : २८/०३/२०२५

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**(स्वाक्षरीत)** शिक्का **सहाय्यक अधीक्षक**
**क.लिपीक** **दिवाणी न्यायालय, व.स्तर, धारूर**

## वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

**श्रीमती एस. व्ही. पावसकर दिवाणी न्यायाधिश क. स्तर, केज, यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक ९३/२०२५, नि.क. ७ / ड**
**आर्यन व इतर विरुध्द निरंक**

ज्यापेक्षा मयत पिंटु उर्फ मारोती पि. दाजी पवार, मु.पो. धारुर रोड केज, ता. केज जि. बीड हे दिनांक १६ माहे ०५ सन २०२३ रोजी मौजे धारुर रोड केज, ता. केज, जि. बीड येथे मयत झाले आहेत. अर्जदार यांनी हया कोर्टास सदरहु पिंटु उर्फ मारोती पि. दाजी पवार, मु.पो. धारुर रोड केज, ता. केज जि. बीड यांचे मृत्यू नंतर त्यांना शासकीय व निमशासकीय कार्यालयीन कामकाजाचा लाभ मिळणेसाठी वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज विधिज्ञ श्री. वाय. व्ही. फुन्ने यांचे मार्फत दाखल केला आहे.

अर्जदार : ०१. आर्यन पि. मारुती पवार वय - २० वर्षे, धंदा - शेती, रा. भवानी चौक सबस्टेशन एरीया केज, ता. केज जि. बीड. संगिता भ्र. मारुती पवार वय - ४३ वर्षे, ०२. धंदा - शेती, रा. भवानी चौक सबस्टेशन एरीया केज, ता. केज जि. बीड.

त्यापेक्षा अर्जदाराशिवाय सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी हया कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबदद्ल लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु **पिंटु उर्फ मारोती पि. दाजी पवार, मु.पो. धारुर रोड केज, ता. केज जि. बीड** यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात देईल.

आज दिनांक १३ माहे ०३ सन २०२५.

पु. ता. २९/०३/२०२५

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**(स्वाक्षरीत)** शिक्का **सहाय्यक अधीक्षक**
**क.लिपीक** **दिवाणी न्यायालय,क.स्तर, केज**

## जाहीर प्रगटन

**श्री.एन.एम.वाली. दिवाणी न्यायाधिश क. स्तर धारुर यांचे न्यायालयात**

**दिवाणी चौकशी अर्ज क. १०६/२०२,५ निशाणी क. ०९/ ड**

अर्जदार - यमुना भ्र. शिवाजी चांदणे वय ५१ वर्षे धंदा घरकाम रा. साठेनगर धारूर ता. चारूर जि. बीड. विरुध्द

सामनेवाला - कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहिरनामा / जाहिरनोटीस द्रवारे असे कळविण्यात येते की,

ज्या पेक्षा मयत शिवाजी पि. शहाजी चांदणे रा. साठेनगर, धारूर ता. धारुर जि. बीड यांचे दिनांक २१/०८/२०२४ रोजी मौजे साठेनगर, धारुर ता. धारुर जि. बीड येथे निधन झालेले आहे. त्यांना अर्जदार हे एकमेव कायदेशीर वारसदार आहेत.

मयत शिवाजी पि. शहाजी चांदणे यांचे पश्चात शासकिय / निमशासकिय व इतर कार्यालयीन कामासाठी अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता अर्जदार हे मयत शिवाजी पि. शहाजी चांदणे यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करुन वारस प्रमाणपत्र देणे बाबत कुणाचीही अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी हि जाहिर नोटीस प्रसिध्द झालेले तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे न्यायालयात प्रत्यक्ष अथवा वकिलांमार्फत हजर होउन लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही, तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावाव घेउन मे न्यायालयात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.आज तारीख २४/०३/२०२५ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिला.

**प्रकरणात पुढील दिनांक : ०३/०५/२०२५**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**(स्वाक्षरीत)** शिक्का **सहाय्यक अधीक्षक**
**क.लिपीक** **दिवाणी न्यायालय, व.स्तर, धारूर**

## जाहीर प्रगटन

**धारुर येथील श्रीमती नुतन सचिन कदम सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर धारुर**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १०१/२०२५, गजराबाई शेषेराव मैद वि निरंक**

मयताचे नाव : मयत **शेषेराव पि.रंगनाथ मैंद** मौजे मंदवाडी धारूर ता. धारूर जि. बीड हे दि.०३/०८/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारस अर्जदार

१. गजराबाई भ्र. शेषेराव मैंद वय ७५ वर्षे, धंदा घरकाम रा मैंदवाडी ता.धारूर जि. बीड २. उत्तरेश्वर पि. शेषेराव मैंद वय ४७ वर्षे, धंदा शेती रा. मैदवाडी ता.धारूर जि. बीड ३. कान्हाजी पि. शेषेराव मैंद वय ४० वर्षे, धंदा शेती रा. मंदवाडी ता.धारूर जि. बीड ४. महानंदा भ्र. हरिभाउ मुंडे वय ३८ वर्षे, धंदा शेती रा. दहिफळ वडमाउली ता. केज जि. बीड

यांनी या न्यायालयास मयत शेषेराव पि. रंगनाथ मैद मौजे मैंदवाडी ता. धारूर जि. बीड हे मयत झाले असून त्यांच्या पश्चात अर्जदारास शासकीय योजनेचा लाभ घेण्याकरीता, व इतर महत्त्वाच्या कामकाजाकरीता, अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा अर्जदार

सदरहु अर्जदार मयताचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत शेषेराव पि.रंगनाथ मैंद मौजे मैंदवाडी ता.धारुर जि. बीड यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक : २१/०३/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख: २८/०३/२०२५**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**(स्वाक्षरीत)** शिक्का **सहाय्यक अधीक्षक**
**क.लिपीक** **दिवाणी न्यायालय, व.स्तर, धारूर**

## जाहीर प्रगटन

**धारुर येथील श्रीमती नुतन सचिन कदम सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर धारूर**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ९८/२०२५, शेषाबाई माणिक जाधव विं निरंक.**

मयताचे नाव : मयत **माणिक पिता कोडिंबा जाधव** मौजे धारूर, जि. बीड हे दि. २५/०९/१९९८ रोजी मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारस अर्जदार

१. शेषाबाई भ्र. माणिक जाधव वय ७० वर्षे, धंदा घरकाम रा. धारूर ता.धारूर जि. बीड

यांनी या न्यायालयास मयत माणिक पिता कोडिंबा जाधव मौजे धारूर ता. धारूर जि. बीड हे मयत झाले असून त्यांच्या पश्चात अर्जदारास शासकीय योजनेचा लाभ घेण्याकरीता, व इतर महत्त्वाच्या कामकाजाकरीता, अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा अर्जदार

सदरहु अर्जदार मयताचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत माणिक पिता कोडिंबा जाधव मौजे धारूर ता.धारूर जि. बीड यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २१/०३/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख : २८/०३/२०२५

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**(स्वाक्षरीत)** शिक्का **सहाय्यक अधीक्षक**
**क.लिपीक** **दिवाणी न्यायालय, व.स्तर, धारूर**

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि.बीड येथील २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एन. ए. रणदिवे यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३२५/२०२५, रूक्मीन लक्ष्मण तांगडे व इतर विरूध्द निरंक**

ज्याअर्थी मयत नामे लक्ष्मण विठ्ठलराव तांगडे, रा. रामपुरी, ता. गेवराई जि. बीड हैहया दिनांक २४/०२/२०२२ रोजी रामपुरी ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क. १ रूक्मीन भ्र. लक्ष्मण तांगडे, वय ३१ वर्षे धंदा ६९ वर्षे, धंदा - घरकाम, रा. रामपुरी ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क. २ गोविंद पि. लक्ष्मण तांगडे, वय - शेती, रा. रामपुरी ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क. ३ मुक्ता भ्र. प्रदीप चव्हाण, वय ४५ वर्षे धंदा घरकाम रा. नागोबा गल्ली, पेठ बीड, बीड ता. जि. बीड, अर्जदार क्र. ४ सुनिता भ्र. दत्तात्रय कठाळे, वय ४१ वर्षे धंदा घरकाम रा. नागोबाची वाडी ता. घनसावंगी जि. जालना, अर्जदार क्र. ५ गंगासागर भ्र. गणेश सोळंके , वय -३८ वर्षे धंदा घरकाम रा. बेलुरा ता. माजलगाव जि. बीड, अर्जदार क्र. ६ रेखा भ्र. नागेश सोळंके वय ३४ वर्षे धंदा घरकाम रा. बेलुरा ता. माजलगाव जि. बीड यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे लक्ष्मण विठ्ठलराव तांगडे, रा. रामपुरी, ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक ०१/०४/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख १०/०६/२०२५**

**(मार्फत - ॲड. धांडे एम. डी. गेवराई)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**(स्वाक्षरीत)** शिक्का **सहाय्यक अधीक्षक**
**क.लिपीक** **दिवाणी न्यायालय, व.स्तर, गेवराई**

CMYK

दैनिक ● epaper.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

बुधवार, दि.०२ एप्रील २०२५ पान ४

## चकलांब्यात यंदा वस्त्रहरण ;चैत्र पौर्णिमेची जय्यत तयारी



**बीड । प्रतिनिधी**

काही वर्षांपूर्वी मराठी रंगभूमीवर प्रचंड गाजलेलं, मच्छिंद्र कांबळी यांचं 'वस्त्रहरण' हे धमाल विनोदी मालवणी नाटक मराठी भाषेत पुन्हा एकदा रंगभूमीवर धूमशान घालण्यास सज्ज होत आहे. या नाटकाचे आजवर ५२५४ प्रयोग झाले असून, लवकरच या नाटकाचा ५ हजार २५५ वा प्रयोग सादर होणार आहे. विशेष म्हणजे चकलंबा येथील कलाकारांच्या संचात या नाटकाचे मोजके ४४ प्रयोग केले जाणार आहेत.मराठी भाषेत रूपांतरित असलेले हे नाटक बघण्याची उत्सुकता लागली आहे,दि १२ एप्रिल रोजी चैत्र पौर्णिमाच्या दिवशी रात्री ८ वाजता हा नाट्य प्रयोग सादर होणार आहे. १६ फेब्रुवारी १९८० साली कै. मच्छिंद्र कांबळी यांनी, गंगाराम गवाणकर लिखित 'वस्त्रहरण' या नाटकाचा पहिला प्रयोग केला होता. व्यावसायिक मराठी रंगभूमीवर इतिहास घडवलेल्या आणि अनेक

# ज्योत्स्ना मॅडमच्या मनी येईना तिथे कोणाचे चालेना

## वृत्तपत्रात बातम्या छापूनही भ्रष्ट कर्मचाऱ्यावर कारवाई होईना

**माजलगाव । प्रतिनिधी**

पंतप्रधान आवास योजनेच्या लाभार्थ्याची लूट काही थांबेना माजलगाव पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी ज्योत्स्ना मॅडम यांच्या मनी काहीच येईना आणि तिथे कोणाचे काहीच चालेना भ्रष्ट कर्मचाऱ्यावर कार्यवाही काही होईना अशा या गटविकास अधिकाऱ्यांच्या वागण्यामुळे माजलगाव तालुक्यातील जनतेत आश्चर्य व्यक्त केले जात आहे

माजलगाव तालुक्यात अनेक ठिकाणी पंतप्रधान घरकुल आवास योजनेची कामे चालू आहेत काही घरकुलांचे प्रस्ताव मंजिरी स्टॉप ऑनलाइन करून पाठवलेले आहेत घरकुल मंजूर करायचे असले तरीही पैसे द्यावे लागतात मंजूर घरकुलाचे हत्या काढायचे असले तरीही पैसे द्यावे लागतात हि बाब लक्षात घेऊन लाभार्थ्यांची लूट थांबावी व भ्रष्टाचाराला आळा बसावा म्हणून अनेक लाभार्थ्यांच्या तोंडी सूचनेनुसार वृत्तपत्रांनी बातम्या मात्र या वृत्तपत्राच्या बातम्या चा कुठलाच असर गटविकास अधिकारी सूचना मॅडम यांच्यावर पडत नसल्याचे दिसून आले अशा कशा वागू शकतात लाभार्थ्याकडून होणाऱ्या लुटीमध्ये गट विकास अधिकारी यांचा तर सहभाग नाही ना असा प्रश्न उपस्थित करून ज्योत्स्ना मॅडमच्या मनी येईना तिथे कोणाचे काहीच झाले ना आणि भ्रष्ट कर्मचाऱ्यांची पाठराखण करत त्याच्यावर कोणीच कार्यवाही करेल ना यामुळे हातबल झालेले लाभार्थी आणि माजलगाव तालुक्यातील जनतेत एक वेगळीच चर्चा होत असून या चर्चेला तिलांजली देण्यासाठी तरी जोशना मॅडम भ्रष्ट अधिकार्यावर कार्यवाही करून दिलासा द्यावा अशी मागणी सर्वसामान्य जनतेतून व्यक्त केले जात आहे



*न्यायाधीश पदी नियुक्ती झालेल्या बीड जिल्ह्याच्या ऋचा कुलकर्णी राज्यात प्रथम त्यांचा सत्कार करतांना ॲड. गणेश करांडे पाटील*

## आश्रम शाळेतील दत्तात्रय शिंदे यांचा सेवापूर्ती कृतज्ञ सोहळा संपन्न

**माझ्या ज्येष्ठ सहकाऱ्यांच्या कष्टामुळे मी भव्य शैक्षणिक संकुल उभा करू शकलो - दिनेश पवार**

**गेवराई । प्रतिनिधी**

येथील प्राथमिक माध्यमिक, उच्च माध्यमिक आश्रम शाळेतील ज्येष्ठ शिक्षक दत्तात्रय सखाराम शिंदे नियत वयोमानाने सेवानिवृत्त झाले. त्या निमित्ताने त्यांचा कृतज्ञता सोहळा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आश्रम शाळा संघटनेचे राज्य उपाध्यक्ष दिनेश पवार हे तर प्रमुख



पाहुणे इतर मागास बहुजन कल्याण विभाग बीडचे सहाय्यक संचालक क्षीरसागर, प्रादेशिक परिवहन बीडचे गणेश विघ्ने, सुशील शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुशील पवार, पीएसआय बोडखे साहेब, मानवत येथील आयटीआयचे उपप्राचार्य सोलवणकर साहेब, पाथरी उपनगराध्यक्ष शरद झाडे, अंथरवन पिंपरीचे प्राचार्य खंदारे, मुख्याध्यापक शिंदे सर, गेवराई

▶▶ उर्वरित पान २ वर



*मुस्लिम धर्माचा पवित्र रमाझन महिना, रमजान ईद निमित्त ईदगाह मैदान येथे मुस्लिम समाज बांधवानी सामूहिक नमाज पठाण करून एकमेकांना ईद च्या शुभेच्छा दिल्या. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी उपस्थित राहुन सर्व मुस्लिम बांधवाना शुभेच्छा दिल्या. त्या वेळी त्यांच्या समवेत राजाभाऊ माहुवाले, संदीप उबाळे, रवी वाघमारे, दिलीप नाना पवार सह आदी शिवसैनिक पदाधीकारी उपस्थित होते.*

## गेवराईच्या "गढी" वर वरूणराजाचे आगमन ,वादळी वाऱ्यासह पाऊस!

**गेवराई । प्रतिनिधी**

वादळी पावसानंतर संध्याकाळी ४ वाजण्याच्या सुमारास गेवराईच्या गढीवर वरुणराजाने हजेरी लावली होती जोरदार वादळी वारे व विजेच्या कडकडाटसह एक तास कोसळलेल्या पावसाने कहर केल्याने सर्वत्र पाणीच पाणी झाल्याने जनजीवन अंशतः विस्कळीत झाले. हीच परिस्थिती पहावयास मिळाली. पावसामुळे पाडळशिंगी व गढी कारखाना परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचले. सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास काळोख दाटून येत काही क्षणात वादळी वारे व विजेच्या कडकडाटांसह पावसाने जोरदार हजेरी लावली.



या पावसाने वातावरणामध्ये गारवा आला. उन्हाच्या काहिलीने हैराण झालेल्यांना दिलासा मिळाला. त्याचबरोबर अनेकांची त्रेधातिरपीट उडाली. ग्रामीण भागात देखील मुसळधार पावसाने अक्षरशः झोडपून काढले. दरम्यान, वादळी वाऱ्याने काही ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याने विद्युतपुरवठा खंडित झाला होता. सायंकाळी उशिरापर्यंत पावसाचा जोर मात्र कायम राहिला होता.

## महायुती सरकारने कर्जमाफी नाकारून बळीराजाशी दगाफटका केला : जिल्हाप्रमुख गिराम

**बीड । प्रतिनिधी**



लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवा मुळे महायुतीने विधानसभा निवडणुकी पूर्वी फसव्या आणि खोट्या घोषणांचा पूर आणला होता त्या पैकीच ऐक असणारी घोषणा म्हणजे शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊन शेतमालाला योग्य हमी भाव देऊन त्यांना सुखाचे दिवस आणू असे आश्वासन देऊन सर्वसामान्य शेतकऱ्यांची मते पदरात पाडून घेतली पण सरकार आल्यावर सदरील घोषणेला महायुती सरकारने हरताळ फासला आहे शेतकऱ्यांना कर्जमाफी देणे तर दूरच उलट त्यांना ३१ मार्च पर्यंत कर्ज भरण्यासाठी दम दिला जात आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी जाहीरपणे शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार नाही असे सांगितले त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही त्यांचीच भाषा बोलून कर्जमाफी कदापि ही होणार नाही असे सांगितले. ज्या सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या मतावर व जीवावर हे सरकार अस्तित्वात आले त्यांच्या सोबतच ह्या महायुती सरकारने दगा फटका करून त्यांना अजूनही आर्थिक अडचणीत आणण्याचे व शेतकऱ्यांना

▶▶ उर्वरित पान २ वर

## डॉ. ज्योती ढगे बनल्या मराठवाड्यातील पहिल्या महिला डीएम निओनेटोलॉजिस्ट

**बीड । प्रतिनिधी**

येथील डॉ. ज्योती मोरे-ढगे यांनी बालरोग विषयातील प्रतिष्ठित डीएम निओनेटॉलॉजी ही सुपर-स्पेशालिटी पदवी यशस्वीरित्या प्राप्त केली आहे. त्या मराठवाड्यातील पहिल्या महिला डीएम निओनेटोलॉजिस्ट ठरल्या आहेत. नवजात शिशूंसाठी अत्याधुनिक उपचार व संशोधन क्षेत्रात त्यांनी मिळवलेले हे यश म्हणजे केवळ शैक्षणिक उत्कृष्टता नसून, नवजात शिशूंच्या उत्तम आरोग्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. डॉ. ज्योती ढगे यांचा शिक्षणातील प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षण जोगे श्वरीच्या महाविद्यालय, अंबेजोगाई येथे



पूर्ण केले. त्यानंतर उच्च माध्यमिक शिक्षण दयानंद कॉलेज, लातूर येथे पूर्ण केले. स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई येथून वैद्यकीयची पदवी मिळवली. पुढे त्यांनी डीएनबी पेडिऍट्रिक्स हैदराबाद येथे पूर्ण केले. नवजात शिशूंच्या उपचारात विशेष प्राविण्य मिळवण्यासाठी त्यांनी डीएम निओनेटॉलॉजी जयपूर, राजस्थान येथे यशस्वीरित्या पूर्ण केले. त्यांच्या या प्रवासात त्यांनी उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरी करत वैद्यकीय क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. या अद्वितीय यशामध्ये त्यांच्या कुटुंबियांचे मार्गदर्शन आणि पाठिंबा मोलाचा ठरला आहे. त्यांचे पती डॉ. कालिदास ढगे (प्रतिष्ठित बालरोग तज्ज्ञ व नवजातशिशु रोग तज्ज्ञ) यांनी त्यांना लग्नानंतर ही अखंड मार्गदर्शन आणि प्रेरणा दिली. तसेच त्यांचे दीर डॉ. प्रविण ढगे (माऊली डेंटल हॉस्पिटल, बीड) आणि डॉ. किरण सवासे (जीवनज्योत हॉस्पिटल, बीड) यांनी देखील त्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक

▶▶ उर्वरित पान २ वर

# माजलगाव तालुक्यात चोरींचे सत्र सुरुच

## घरफोडी करुन सोन्या चांदीचे दागीण्यां सह ५ लाख, ३७ हजारांची चोरी

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरा सह तालुक्यात चोरींचे सत्र सुरुच असल्याचा प्रत्य येत असुन मार्च महिण्यात चार ठिकाणी झालेल्या चोरींचे तपास चालु असताना एका हि चोरी प्रकरणी माजलगाव पोलीस यंत्रणेला यश मिळाले नाही. यात दिवसाच घरफोडी करुन सोन्या चांदीचे दागीण्यां सह ५लाख, ३७हजार रुपयांच्या चोरीची घटना घडली. या घटने प्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार माजलगाव तालुक्यातील नागडगाव रहिवाशी तथा माजलगाव बस आगारात मैकेनिक असलेले लक्ष्मण आश्रुबा खामकर यांनी माजलगाव ग्रामिण पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी नुसार ३१मार्च रोजी च्या सकाळी ९वा.च्या सुमारास ड्युटीवर गेले.

आणि आई, वडील, पत्नी



शेतात कामासाठी गेले होते तर एक मुलगा घरी होता लक्ष्मण खामकर ४:३०वा.दरम्यान ड्युटीवर असताना त्यांचा विजय नरहरि खामकर यांनी फोन वरुन सांगितले की, घराचे कुलूप तोडुन कडी उघडून चोरी झाली आहे. यावर लक्ष्मण खामकर नागडगाव येथे घरी गेले व त्यांनी पाहिले की,अज्ञात चोरटयाने घरात प्रवेश करत कपाटाची चावी हुडकुन कपाट उघडून लॉकर तोडुन त्यात ठेवलेले खालील वर्णनाची सोन्या, चांदीचे दागीने व नगदी रक्कम १२हजार असे मिळुन ५लाख,३७हजार रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेला. २.७तोळे वजनाचे गंठण किंमत अंदाजे १लाख,८हजार, १.४वजनाचे मिनी गंठण किंमत अंदाजे ५६हजार,५ ग्राम वजनाच्या सोन्याच्या ३अंगठ्या किंमत अंदाजे ६०हजार, १तोळा वजनाचा सोन्याचा तुकडा किंमत अंदाजे ४०हजार ,५ग्राम वजनाचे मिनी गंठण अंदाजे किंमत अंदाजे २०हजार , ५ग्राम वजनाचे साखळी व ओम किंमत अंदाजे २०हजार,५नग ओम ५ग्राम वजनाचे किंमत अंदाजे २०हजार रुपये. ४ग्राम वजनाची सोन्याची ठुशी किंमत अंदाजे १६हजार,३ग्राम वजनाच्या ३बाळ्या किंमत अंदाजे १२हजार, ३ग्राम वजनाचे कानातील पत्ते किंमत

▶▶ उर्वरित पान २ वर




## आदित्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाषचंद्र सारडा यांच्या वाढदिवसानिमित्त ३४० जणांचे रक्तदान

**जिल्हारुग्णालयात रक्ताचा तुटवडा असतांना रक्तदानांचा उपक्रम अत्यंत स्तुत्य**

**बीड । प्रतिनिधी**

आदित्य शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तसेच द्वारकादास मंत्री बँकेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात आले. या रक्तदानाच्या उपक्रमाला दात्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद देत तब्बल ३४० जणांनी रक्तदान केले त्यामध्ये ९५ महिला २४५ पुरुष सहभागी झाले होते . जिल्हारूग्णालयात रक्ताचा तुटवडा निर्माण झाल्यानंतर आदित्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तसेच द्वारकादास मंत्री बँकेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा यांच्या वाढदिवसानिमित्त राबवलेल्या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतूक होत आहे.

कार्यक्रमाला डॉक्टर हिमांशू श्रीवास्तव, डॉ. विवेक कुलकर्णी, डॉ. कल्याण अपेट, शाम भुतडा, डॉ. सतीश कचरे, डॉ. अमोल सानप, डॉ. बालाजी बहिरवाल, डॉक्टर विकास गर्जे यांच्यासह असंख्य लोक उपस्थिती होते. शिबिरात सहभागी झालेल्या



रक्तदात्यांना प्रमाणपत्र व अल्पोपाहार देण्यात आला. रक्तसाठ्याची गरज लक्षात घेऊन भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करण्याचा मानस आयोजकांनी व्यक्त केला. रक्तदान हा समाजासाठी एक प्रकारचे अमूल्य योगदान आहे. रक्तदान करून आपण कोणाच्यातरी जीवनरक्षणासाठी मदत करू शकतो. त्यामुळे प्रत्येकाने स्वतः हून पुढे येऊन रक्तदान करावे आणि या महान कार्यात आपला सहभाग नोंदवावा. 'रक्तदान, जीवनदान' ही संकल्पना आचरणात आणल्यास समाज निरोगी आणि सक्षम होईल. असे प्रतिपादन सीए. गिरिश गिल्डा यांनी व्यक्त केले.

### रक्तदान करणे ही सामाजिक बांधिलकी

**रक्तदान करणे हे आपले कर्तव्य आणि त्याचबरोबर सामाजिक बांधिलकी देखील आहे. आपण केलेल्या रक्तातून एखाद्या रुग्णाचा जीव वाचवणे यासारखे दुसरे पुण्य नाही. अचानक होणाऱ्या अपघातामध्ये गंभीर जखमी रुग्णांवर तातडीने शस्त्रक्रिया करावी लागते. त्यावेळी रक्ताची अवश्यकता असते. यासाठी रक्त पेढी शिवाय दुसरा पर्याय नसतो. मात्र काही दिवसापासून बहुतांश रक्त पेढ्या कडे आवश्यक असणारा रक्त साठा शिल्लक राहत नसल्यामुळे त्याची चिंता वाढलेली आहे. त्यामुळे पुढील काळात रक्तदानाची चळवळ व्याप्ती वाढवणे गरजेचे आहे. -डॉ. आदिती सरडा, संचालिका**